# मेघना पेठे यांच्या ‘नातिचरामी’ कादंबरीतील स्त्रीवाद

**हर्षा गोपाळराव कुकसे**
संशोधक विद्यार्थी
मराठी विभाग प्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
Mob. No. - 9881603944

**प्रा. डॉ. अशोक भारत भक्ते**
मार्गदर्शक
मराठी विभाग प्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. शैलेंद्र लेंडे**
संशोधन केंद्र प्रमुख
मराठी विभाग प्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.146

---

***सारांश :***

*मेघना पेठे ह्यांचा मूळ स्वभाव कथालेखनाचा असला तरी ‘नातिचरामि’ ह्या कादंबरीलेखणाने त्यांच्या आगळ्यावेगळ्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची ओळख करून दिली. त्यांच लेखनपरंपरा, संस्कृती, संकेत, नियम यांच्या कक्षांना छेदत स्त्रीमनाचे वास्तवभान, स्त्रीच्या स्वतंत्र, स्वयंभू अस्तित्वाचे दर्शन घडवते. आजच्या या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे असणे ही एकमेव महत्त्वाची भूमिका स्वीकारुन मेघना पेठे यांनी ‘नातिचरामि’ या कादंबरीतून आत्मलक्ष्मी व आत्मकेंद्री स्त्रीवादाची मांडणी केली आहे. त्यांनी स्त्रीच्या असण्याची जिवंत संवेदनशील बाजू समाजासमोर कादंबरीच्या रुपाने साकारली आहे.*

*मनुष्य जगण्यासाठी नीतिनियम, संकेत बनवितात व प्रसंगाधीष्टीत वर्तनानुसार कधीकधी त्यात फेरबदल करतात. तेच संकेत त्यांना जाचक वाटू लागतात. तेव्हा जगण्याचे पर्याय निवडले जातात. त्या वेळी समाजातून विरोध होतोच. पण त्या वेळी मात्र समाजमनाच्या मजबुरीस ‘‘नियम करणाऱ्या, नियम पाळणाऱ्या व नियम मोडणाऱ्या समस्त मानवजातीस...’’ मेघना पेठे ही कादंबरी अर्पण करताना दिसतात. स्त्रीमनाच्या गुहेत दडलेले जिवंत वास्तव, लैंगिक भावभावना जी मुक्तपणे बोलण्याची भीती वाटते त्या बाबी त्यांनी यातून बोल्डपणे निर्भिणपणे त्यावर भाष्य करून साकारलेल्या आहेत. मेघना पेठे यांच्या लेखनामागे त्यांची चिंतनशील वृत्ती, स्त्री पुरुषाबाबत चिकित्सक बुद्धीने मांडलेले विचार पुरुपप्रधान समाजातील स्त्रीचे स्थान इत्यादींची पार्श्वभूमी आहे. त्यांचे लेखन सुजाण वाचकास अंतर्मुख करते.*

**विजशब्द :** स्त्रीवाद, वेदना आत्मचिंतन, आत्मास्थिती वास्तविकता, अविष्कार मनोवृती

---

**प्रास्ताविक :**

मेघना पेठे ह्या स्त्रीवादी लेखन करणाऱ्या अलीकडच्या काळातील ख्यातनाम लेखिका आहेत. त्यांनी कथा, कादंबरी या वाङ्मय प्रकारांतून साहित्यलेखन केलेले दिसून येते. साठोत्तरी काळामध्ये त्यांच्या

'नातिचरामि' सारख्या उत्कृष्ट कादंबरीलेखनाने मराठी साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली. त्याचबरोबर त्यांचे एकूण दोन कथासंग्रही प्रकाशित झाले आहेत. मेघना पेठे ह्यांचा मूळ पिंड कथा लेखनाचा असून त्यांचा १९७७ साली 'हंस अकेला' हा सात कथांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यापाठोपाठ 'आंधळ्याच्या गायी' हा पाच कथांचा कथासंग्रह २००० साली प्रकाशित झाला. अशा प्रकारे १९९० ते २००० च्या दशकातलं त्यांच कथालेखन असल्याचे दिसून येते.

नातिचरामी ही राजहंसनंच प्रकाशित गेलेली ३३५ पानांची त्यांची पहिली कादंबरी आहे. एका वर्षाच्या दरम्यान दोन आवृत्या प्रकाशित झाल्यामुळे मराठी जगतानं त्यांच्या कादंबरीचीही गंभीर दखल घेतली. असा निष्कर्ष काढायला हरकत नाही. कथाकार ते कादंबरीकार असा मेघना पेठेंच्या गेल्या पंधरा—वीस वर्षांच्या काळातील लेखनाचा एक मौलिक असा टप्पा आहे. मेघना पेठे मराठीतल्या बोल्ड आणि निर्भयपणे अभिव्यक्ती करणाऱ्या लेखिका मानल्या जातात. ते खरंही आहे. मेघनाचं लेखन परंपरा, संस्कृती, संकेत, नियम आदींच्या कक्षांना छेदत स्त्रीमनात खोलवर दडलेल्या स्त्रित्वाचं, स्वत्वाचं आणि विशेषत: स्त्रीच्या स्वतंत्र स्वयंभू अस्तित्वाचं तटस्थ दर्शन घडविणारं आहे. मेघनाच्या नायिकांमधलं स्त्रीत्व हे खरंतर आजच्या आधुनिक काळातल्या कोणत्याही स्त्रीच्या मनातल अस्सल आणि वास्तव स्त्रीत्व प्रकट करणार आहे. मेघना स्त्रीत्वाची मांडणी बोल्डपणे करते कारण स्त्रीनं बोल्ड असणं आपल्या पुरुषप्रधान सांस्कृतिक समाजव्यवस्थेला अमान्य आहे. कलाकृतीत कलेच वास्तव आणि सत्य मांडायच असेल तर कलावंताला मेघनासारखं बोल्ड व्हाव लागतं. या अंगान जर मेघनाच्या बोल्ड लेखनाचा विचार केला तर तिनं समाजासमोर स्त्रीच्या असण्याची जिवंत संवेदनशील बाजू बोल्डपणे मांडली आहे हे लक्षात येत.

**विषय प्रवेश :**

मेघना पेठे यांनी आधुनिक काळातील स्त्रियांच्या मनाचे अनेक सुप्तगुण कोपरे उघडून स्त्रियांकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी समाजाला दिली आहे. 'नातिचरामि' हे त्या संदर्भातील एक उत्तम उदाहरण आहे. मेघना पेठे यांच्या नायिका या आधुनिक समाजातल्या आधुनिक आणि समजस स्त्रीत्वाचा तळ गाठणाऱ्या आणि मनाचा ठाव धुऊन, चिंतनाला प्रवृत्त करतात. वाचकाला अस्वस्थ करून मनात असलेली संकेतव्यवस्था मोडकळीस आणतात. आपल्या भोवतालच्या स्त्रीविश्वासाविषयी केवळ सहानुभूतीच नव्हे तर तिला आपल्याच एवढं किंबहुना आपल्याहीपेक्षा उदात्त असं व्यक्तिमत्त्व असल्याची जाणीव निर्माण करून, भूतकाळातल्या आपल्या वागणूकीचा पुनर्विचार करायला लावतात. स्त्रीकडे पाहण्याची सजग दृष्टी प्रदान करतात.

मेघना पेठे एक स्त्री म्हणून व्यक्तीच्या जीवनाकडे कोणत्या दृष्टीने पाहते; हे लक्षात घेतल की, तीने लिहिलेल्या कलाकृतीमागील दृष्टीकोन सहज लक्षात येतो. माणसाचं उत्कट जगणं आठवणींच्या रूपात चिरंतन ताज आणि नवीन अर्थ उलगडत जाणारे असते. प्रत्येक व्यक्तीच्या भोवताल वरवर सारखाच असला तरी प्रत्येकाचं प्राक्तन निराळ, निर्णय निराळे, स्वीकार—नकार निराळे, कारणं निराळी असतात. मेघनाच्या मते प्रत्येक व्यक्ती दुसरीहून निराळी! स्वतंत्र ! माणयाच्या जगण्यात प्रातिनिधिक असं काही नाही. अगदी आपण सुध्दा आयुष्यातल्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे असल्याचं अनुभवत असतोच की! जितकी आपली उमजण्याची ताकद मोठी तितकं आपल भंगणं अधिक! उमजून घेण्याचा मनानं सोबत उरते ती

एकाकीपणाची तीव्र वेदना! या अगानं जीवनाकडे पाहिलं की, जाणिवेचा अथांग आकाशात झेप घेऊ पाहणारा प्रत्येक हंस अकेला आहे! असे मेघनाला वाटते. ते तिच्याच दृष्टीने नव्हे तर प्रत्येक संवेदनशील हळव्या मनाच्या व्यक्तीलाच जीवनाच हे सुटं वास्तव जाणवतं. मग ती स्त्री असो की पुरुष.

मेघना पेठे या एक व्यक्ती म्हणून पुरुषांप्रमाणे स्त्रीचाही विचार करते. जीवनाची नवी नवी आकलने आणि आवाहाने म्हणूनच तिच्या कलाकृतीतून तिला मांडता आली. सामाजिक संकेताशी आणि नियमांशी झगडून तिच्या नायिकांना नैसर्गिक आणि निकोप प्रेरणास्त्रोतांशी हातमिळविणी करणे शक्य झाले. स्त्री–पुरुष समानतेच्या सीमांना तिने अधिक विस्तृत आणि व्यापक केले आहे. मेघना पेठे स्त्री भूमिकेसंदर्भात किशोर सानप म्हणतात, ''स्त्रीवादाची प्रगल्भ आणि समंजस जाण तला आहे परंतु ही जाण तिच्या अनुभूतीच्या उलगडत जाणाऱ्या कालसंवेदनाशी निगडित असते. प्रत्येक अनुभवाला ती आपल्या अंत:करणाच्या मुशीत उलटसुलट, निखळ काही हाती लागतं काय? ह्या जीवनमूल्य शोधाच्या निरंतर प्रक्रियेत ती आपल्या घटितांची आणि संबंधात आलेल्या स्त्री–पुरुषांची उलटतपासणी करीत, स्वत:च्या जीवनातल्या निवडलेल्या पर्यायांचा उलगडा करण्याच्या चिंतनक्रियेतच ती आधिक्यानं व्यस्त असते.''

मेघना पेठे या स्त्री आणि पुरुष या दोघानांही नैसर्गिक आणि स्वाभाविक जीवन जगण्याचा समानाधिकार माननारी आहे. पुरुषांना असे लिंगजाणिवांवर मोकळे भाष्य करण्याचा अधिकार आहे तसाच तो स्त्रियांनाही आहे असे ती मानते. आपल्या भोवतालच्या किंवा आपल्या घरातल्या स्त्रियांचे आणि त्यांच्या भल्याचे आपणच भाग्यविधाता आहोत, या वर्तुळातून आपण बाहेर पडून कधी तिचा विचारच करीत नाही. स्त्रियांच्या बाबतीत असे आपण भाग्यविधाता मानतो तसेच घरातल्या कर्त्या स्त्रियांसुद्धा आपल्याच विचारव्यूहात जगत असल्यामुळे इतर स्त्रियांच्या भल्याचा मक्ता प्रमुखाकडे देवून त्याच्याच कृतीचे समर्थन करीत स्त्रियांना समजून घेत नाहीत. स्त्रियांवर मग स्त्रियाच अन्याय करतात. अन्यायाच्या परि निराळ्या असतात, असे स्वत: मेघना पेठे स्त्रियांबद्यल बोलतात. मेघनानं पुरुष प्रधान संस्कृतीत जगणाऱ्या स्त्री आणि पुरुषांच जीवन वास्तव 'नातिचरामि' मधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्त्रीच्या व्यथावेदना :**

कादंबरीतून मीराच्या जीवनाचा वेध घेता असे लक्षात येते, की मीरा सुशिक्षित, सुंदर आर्थिकदृष्ट्या सक्षम असली तरी तिचे दोनदा लग्न होऊनही दोन्ही टिकली नाही. तिची दोन्ही लग्ने मोडलीत म्हणजे तिच्या ज्या नवऱ्याकडून केवळ सहचर, समजून घेणारा भावनिक आधाराचा मित्र म्हणून तसेच शारीरिक व मानसिक आधाराचा नवरा म्हणून ह्या ज्या सुप्त अपेक्षा होत्या त्या सार्थ होत्या आणि त्या दोन्ही नवऱ्यांकडून पूर्ण झाल्या नाही. व ते दोघेही तिला सोडून गेलीत. तिच्या संसारात तिच्या भावनांना कुणीच समजून घेतले नाही. तिचा संसारी मित्रही ज्याच्यावर तिने जिवापाड प्रेम केलं तोही त्याच्या संसारात खूश होता. एक दिवस मिराला कायमचा सोडून जातो तर 'लोभी' हा दुसरा मित्र तोही तिला सोडून जातो. योग्य प्रसंगी ह्या भावभावना मेघना पेठे यांनी मीराच्या बाबतीत व्यक्त केल्या असल्या तरी त्या सामान्यत: स्त्रीच्या व्यथावेदनाच होय. त्या कादंबरीतून मीराच्या रुपाने व्यक्त केल्या आहेत.

मेघना पेठे यांनी 'नातिचरामि' तून मीराच्या रुपाने बोल्ड नायिका उभी केली आहे. तिच्यातील स्त्रीत्व हे खरंतर आजच्या आधुनिक काळातल्या कोणत्याही स्त्रीच्या मनातलं अस्सल आणि वास्तव स्त्रीत्व

प्रकट करणारं आहे. मेघना पेठे यांनी स्त्रीत्वाची मांडणी बोल्डपणे केली. ते त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. त्यांच्या लेखनशैलीचे कौतूक करतांना रेखा इनामदार साने म्हणतात ''मेघना पेठे यांच्या कसदार व गुणवान कथालेखनाने वाचकाच्या मनात एवढ्या अपेक्षा निर्माण केल्या होत्या, की 'नातिचरामि' ही कादंबरी प्रकाशनपूर्व काळातही चर्चाविषय ठरली.'' हे अगदी बरोबर आहे. 'नातिचरामि' या नावातच कादंबरीचं गूढ दडलेलं आहे. नेति—नेति म्हणून हे नाही, तेनाही, अमुक नाही, टमुक नाही असं म्हणतं नकारात्मक पद्धती सदृश्य, परंतु मुळात सकारात्मकतेने सत्याचा शोध घेण्याची ही पद्धती आणि चरामी म्हणजे अंतिम सीमेपर्यंत जाणे अशा प्रकारे 'नातिचरामि' या संस्कृत पण मराठीकरण झालेल्या शब्दाचा अर्थ म्हणे नात्यागोत्याचा चरमसीमांची गोष्ट असा सांगता येतो. या गात्यागोत्यात मीरा कधी दडली गेली. तिच्या व्यथावेदना, तिची मानसिक घुसमट, भावनिक कोंडी कशी वाढत गेली याचे जिवंत उदाहरण यातून साकार होत जाते. मीराचे जीवनवास्तव हळूहळू कथारूपाने वेग घेत जाते. 'नातिचरामि' तील नायिका मीराच्या दु:खाबाबत बोलताना डॉ. किशोर सानप म्हणतात, ''जगण्याच्या नियमांना नेति—नेति म्हणत जगण्याचं सत्य शोधणं या चिंतन विचार व्यूहातच रमणारी, अनुभवणारी आणि दु:खही भोगणारी नायिका म्हणून मीराची जैविक आणि मानसिक मांडणी मेघनाने 'नातिचरामि' मध्ये केली आहे.'' मीराच नेति—नेति म्हणजे सामाजिक संकेतांची, रूढीची, नियमांची, परंपराची मोडतोड नाही. मीराने जगण्यासाठी सुख देऊ शकणाऱ्या गोष्टी स्वीकारण्याचा प्रयत्न केला आहे. लग्नसंस्थेत शरीरसंबंध हा अंतिम प्रश्न नसतो तर ती केवळ एक जैविक इच्छा असते. ही नैसर्गिक प्रेरणा कायम जैविक नसते आणि या जैविक इच्छेसाठी शरीरसंबंधाबाबत समज—गैरसमज या एकमेव करण्यासाठी तिचं पहिलं लग्न तुटते. मीरा आणि तिचा पहिला नवरा वेगवेगळे मार्ग अवलंबतात तेव्हा तिचे वडील तिला लग्न टिकवण्याचा सल्ला देताना म्हणतात, ''एक बाप म्हणून एवढंच म्हणेन की तुझ्या कृतीचा हेतू फक्त तुला माहीत असून पुरेसा नाही. दुसरा त्याचे काय अर्थ काढतो, काढू शकतो ते बघणं माझ्या मते महत्त्वाचे आहे.'' मीराला जीवनरहाटीचा अर्थ समजावून सांगताना मीरा ही बापाच्या सल्ल्याला जुमानत नाही. कारण तिच्या त्या संवेदनशील ममाला पटण्यासारखं नाही. आपल्या आईबाबांच्या लग्नात, संसारात नको असलेल्या तडजोडी आणि नाइलाजच अधिक जाणवतो. आईने कायकाय सोसल, संसार टिकवताना कुठल्या तडजोडी केल्या त्या मीराने अगदी जवळून पाहिल्या. म्हणून ती बाबांच्या लग्न टिकवण्याच्या सल्ल्यावर आपले मत व्यक्त करताना म्हणते, की ''लग्न ही एक शारीरिकच, सामाजिकच नव्हे तर आत्मिक गरज असणारी बाई तुम्हांला बायको म्हणून मिळाली. सहज अपघातानं, ध्यानीमनी नसताना लागलेल्या लॉटरीचा मानसानं आनंद जरूर मानावा, पण अभिमान बाळगणं मूर्खपणाच आहे.'' असं मीराचं स्पष्ट मत होत. यावरुन तिच्या आईने संसारासाठी, तो टिकविण्यासाठी कोणत्या तडजोडी केल्या, कोणता दु:खाचा भोगवटा भोगला, केवळ नवरा ही आत्मिक गरज म्हणून, त्या व्यथावेदना सहन केल्या म्हणून, बाबाचे लग्न टिकले आणि बाबांना त्याचा अभिमान आहे हा मूर्खपणाच नव्हे काय? आणि उलट तेच आपल्याला लग्न टिकवण्याचा सल्ला देतात हा विरोधाभास येथे जाणवतो. शिवाय आईही तिला 'सहन कराव गं...' असं म्हणूनच समजूत काढते. कारण आईने तिच्या आयुष्यात सगळं सहनच केले असतं. केवळ आत्मिक गरजेपोटी म्हणूनच तिचं लग्न टिकलं यावरुन आईची व्यथा स्पष्ट जाणवते.

**स्त्रीचे अस्तित्वभान :**

'नातिचरामि' तून स्त्रीचे अस्तित्वभान मांडताना मेघना पेठे यांनी मीराबरोबरच विविध स्त्रियांच्या

जीवनप्रवासातून स्त्रीचे अस्तित्व, वास्तविक परिस्थती साकारलेली दिसून येते. मीराची आजी सोशीक वृत्तीची होती. ती मीराला पहाड अवघड वाटला आणि दुरुन दुसरा पहाड जर चांगला वाटला तर तो उतरायचा नाही. कारण काटे सर्वत्र आहेत. याची जाणीव देऊन संसार टिकविण्याचा सल्ला देते तर मीराची आई ही सहनशील वृत्तीची असल्याचे लेखिकेने साकारले आहे. मीराचे वडील मीरावर अपार प्रेम करते. पण आईशी त्यांचे नाते पुरुष म्हणून पुरुषासारखेच होते. तिथे तो उत्तम नवरा म्हणून, जोडीदार म्हणून यशस्वी नव्हता. आईने ते नाते टिकवले म्हणून ते टिकले तरी आई तिला सहन करावं, असाच सल्ला देते. कारण आईनेही कायम या पुरुषप्रधान संस्कृतीत सहनचं केलं. पण याविरुद्ध कधी आवाज उठवला नाही. आत्याचा नवरा तर स्त्रीलंपटच होता, त्याचा तिला खूप त्रास होता. तरी ती त्याच्याशीच संसार करते. तर मावशी ही दिसायला कुरुप असल्याची जाणीव करून देऊन तिचं अस्तित्व सिध्द करीत जातो. पण काही दिवसांनी त्याच्या मृत्यूनंतर ती दुसऱ्या पुरुषाशी विवाह करते. पण तोही त्याच मार्गाने जाऊन तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाराच निघतो. यावरून स्त्रीला स्त्री म्हणून समाजात सन्मान मिळत नसून त्या प्रवृत्तीविरुध्द धीटपणे मीरा झगडते. या व्यथा जेव्हा तिच्या वाट्याला येतात तेव्हा तिच्यातील स्त्रीत्व जागे होते. ती स्वतंत्र, स्वायत्त स्त्री म्हणून जगण्याचा निर्णय घेते. स्त्री म्हणून स्त्रीत्व जागे होऊन जगण्याचा, मनाप्रमाणे आयुष्य घालविण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे दाखवून देते. मीराची मैत्रीण हवोवी घरून प्रेमविवाहाला संमती नसल्याने होस्टेलवर राहायला येते, घर सोडते, पण त्याच्याशीच प्रेम विवाह करण्याचा निर्णय घेते. यावरुन आजची स्त्री ही स्त्रीत्व जागे झालेली स्त्री असून जगण्याचे पर्याय शोधणारी आहे. तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव आहे. म्हणून स्त्री ही पुरुषप्रमानेच लिंग जाणिवांबाबत, संबंधांबाबत बोलताना दिसून येते. मेघना पेठे यांची मीरा खूप संवेदनशील आहे. मीराचा मित्र समर हा सुलूवर खूप प्रेम करतो. तिच्यासाठी धर्मपरिवर्तनही करायला तयार होतो. पण सुलू त्याच्याशी विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी दुसऱ्या पुरुषाच्या प्रेमात पडते. त्या वेळी मीरा दु:खी होते. सुलू समरला सोडून जाईल की काय, या विचाराने विव्हळते, दु:खी होते, पण हीच परिस्थिती मीरावर येते तेव्हा तिचं एका संसारी मित्रावर प्रेम जडते. तेव्हा त्याची वाच्यता त्याने घरी बायकोजवळ करावी, अशी त्याच्याकडून अपेक्षा करते. हा विरोधाभास येथे निदर्शनास येतो. मीरा कादंबरीतून स्त्रीपुरुष संबंधाविषयी स्पष्टपणे बोलनांना दिसून येते. तसेच तिला लग्नाला नकार दिलेला, पण ऐतिहासिक पिकनिकमध्ये त्याच्याशीच एकांतात सुखाचे क्षण अनुभवलेली मीरा त्या सर्व बाबी तपशिलासह मांडताना दिसून येते, यावरून आजच्या स्त्रीला तिचं स्वत्व, अस्तित्व, भान जागृत झालं असल्याचे जाणवते.

**स्त्रीविषयक जीवनजाणिवांच्या सुक्ष्म भावछटांचे चित्रण :**

मेघना पेठे यांच्या 'नातिचरामी' कादंबरीतील संघर्ष हा जगण्यासाठीचा जीवनजाणिवांबाबतचा संघर्ष आहे. तिच्या आयुष्यात येणारा नवरा एक सहचर म्हणून तिला समजून घेणारा तिला हवा आहे. त्यासाठीच तिचा हा प्रामाणिक संघर्ष आहे. यासाठीच मीरा कायम धडपडतांना दिसून येते. ती प्रामाणिक वृत्तीची व आधुनिक विचारसरणीची आहे. ती स्वतंत्र जीवनाची अपेक्षा मनी बाळगतांना तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार सहन करीत बसण्यापेक्षा प्रतिकारासाठी सदैव तत्पर असलेले मीराचे व्यक्तीमत्व दिसून येते.

मेघना पेठे यांच्या लेखनाचा व्यक्तिकेंद्री दृष्टिकोनच स्त्रीविषयक जीवनजाणिवांचा सुक्ष्म भावछटा उमटवत जातात ते त्यांच्या कादंबरीतून प्रत्ययांस येते. प्रत्येकाचं जगण वेगवेगळ असतं. जरी वरवर

प्रत्येकाच्या भोवताल सारखा वाटत असला तरी प्रत्येकाचं प्राक्तन निराळ, निर्णय निराळे, स्वीकार—नकार निराळे, कारणंही निराळी असतात. प्रत्येक व्यक्ती ही दुसरीहून निराळी असते. माणसांच्या जगण्यात प्रातिनिधिक काहीच नसते पण माणसाच्या जीवनातील संवेदनशीलतेची हळव्या मनाचं प्रतिक असलेली एकाकीपणाची तीव्र वेदना ही व्यक्तीच्या जीवनाचं वास्तव आहे. तेच साकारतांना सुक्ष्म भावछटांचे वर्णन कादंबरीतून आले आहे. माणसाच्या जीवनात घटना घडत जातात. त्यांच्या वागण्याचे वेगवेगळे पर्यायही असतात. जसे तडफडणं, हसणं, रडणं, हरणं, जिकणं, क्षमा, सुड, स्वीकृती, साक्षित्व या पर्यायापैकी कोणताही एक पर्याय निवडून जगण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला हवं असतं. 'नातिचरामी' ची नायिका मीरा ही स्वतंत्र व स्वनिर्णयाने जगणारी आधुनिक काळातील संवेदनशील व हळव्या मनाचे, स्त्रीत्वाचे प्रतिक आहे.

**निष्कर्ष :**

- साठोत्तरी स्त्रीवादी कादंबरी वास्तवाशी नाते सांगणारी, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी, शोषणमुक्त जीवनाचे स्वप्न पाहणारी लोकभिमुख असल्याचे दिसते.
- मानवी नातेसंबंधांचा शोध घेत लग्नसंबंध व लग्नबाह्य संबंधावर विचार करायला लावणारी व वाचकास अंतर्मुख करणारी कादबंरी म्हणून 'नातिचरामि' कडे पाहावे लागते.
- कादबंरीस 'नातिचरामि' हे शीर्षक अगदी अर्थपूर्ण व योग्य वापरले आहे. संस्कृत पण मराठीकरण झालेल्या या शब्दातून नात्यागोत्यांच्या चरम सीमांची गोष्ट सांगितली आहे.
- मेघना पेठे यांनी कादंबरीतून आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या जीवन विषयक समस्या मांडून स्त्रीमुक्तीची कास धरलेली आहे.
- नायिकाप्रधान कादंबरीतून सुसंस्कृत व सुशिक्षित नायिकेच्या विचारातून समाजात नवविचारांची रूजवणूक होताना दिसते.
- नवविचारांमुळे त्यांचे साहित्य आजच्या सुजाण वाचकास व समाजात प्रेरणादायी ठरते.
- मेघना पेठे यांनी समातातील वास्तव नायिकेच्या जीवनानुभूतीद्वारे रेखाटले आहे.
- नायिका प्रधान कादबंरीतून स्त्रीजीवनाचा वेध घेतलेला दिसून येतो.
- मेघना पेठे कादंबरीतून संकेत आणि नियमापेक्षाही माणसाच्या नितळपणाला आणि तळाचा ठाव घेण्याला महत्व देते.
- मेघना पेठे प्रथम पुरुषी निवेदनातून समकालीन, सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीचं स्वत्व आणि भावविश्व मोकळेपणाने निर्भयपणे मांडते.

**संदर्भग्रंथ :**


- मेघना पेठे : 'नातिचरामि', राजहंस प्रकाशन, पुणे, २००५
- मेघना पेठे : 'स्त्री पुरुष नाते' : माझी भूमिका 'शब्दालय' श्रीरामपूर, दिवाळी १९९५. पृ. १८६
- डॉ. किशोर सानप : समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या, उ.नि. पृ.क्र. ५३
- डॉ. स्मिता कांबळे : मराठी कादंबरी प्रवाह व समीक्षा (डॉ. ह.तु. थोरात गौरवग्रंथ), संपा. डॉ.

प्रल्हाद वावरे, प्रा. अभय जोशी, लभ प्रकाशन, अमरावती, १० एप्रिल २०११, पृ.क्र. १३६

- अश्विनी धोंगडे : स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३